ISSN 2231-1629 Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# इतर मागासवर्गियांचे (ओ.बी.सी.) जीवनमान उंचावण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची नव संकल्पना

**प्रो. डॉ. अशोक पवार****
*सहयोगी प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

**बागुल कोंडीराम बन्सी***
*(पिएच.डी. संशोधक)*
*म. फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

**गोषवाराः**
*ज्या समाजात हजारो वर्षाची विषमता होती नुसती अशा समाजात समतेचा कायदा करून या धार्मिक, सामाजिक विषमतेला ओबीसी प्रवर्गामध्ये एकच उपाय आहे ते म्हणजे ओबीसीला आरक्षण देणे. हा एकमेव उपाय आहे. त्या उपायामुळे इतर मागासवर्गिय समाजात एक समाज समता दृष्टि समाजाची संकल्पना पूर्ण होईल. ओबीसी समाजाला इतर समाजाच्या पातळीवर एक येण्यासाठी ज्या मुलभूत गोष्टी उच्च समाजातील विद्यार्थ्यांना किंवा नागरिकांना मिळतात त्या सर्व मुलभूत गोष्टी मिळाल्यानंतरच ओबीसी समाज इतर समाजाच्या पातळीबरोबर येईल म्हणून डॉ. बाबासाहेब यांनी ओबीसीं मध्ये समानता प्रस्तापित व्हावी म्हणून आरक्षण एक औषध आहे. हजारो वर्षे ओबीसी जनजाती या पारंपारिक व्यवसाय मध्ये शेतमजूरी निगडीत बाराबलुतेदार म्हणून भारतात विखुरलेले आहेत किंवा दारिद्र्याच्या आर्थिक विषमतेत बुडालेले आहेत. या त्यांच्या मूळ सामाजिक सशक्त वर्गाची पुर्णरचना होणे आवश्यक आहे. त्यासाठीचा जालीम उपाय म्हणजे सर्वच क्षेत्रात आरक्षण मिळणे क्रमप्राप्त आहे.*

***Key words :***
*सामाजिक विषमता, सामाजिक, आर्थिक व राजकिय आरक्षण, भारतीय राज्यघटना, कलम, उच्च शिक्षण, ओबिसी.*

**प्रस्तावनाः**
भारत भूमीत इ.स. पूर्व १८७ सुरवातीस संस्कृती सभ्यता आणि संस्कृती होती. ही संस्कृती जगातील वर्गात प्राचीन आणि विकसीत संस्कृती होती. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारित होती. (युरोपियन आर्य, ब्राम्हणांनी) या संस्कृतीतील २८ भारतीय लोकांवर आक्रमण करून ही संस्कृती नष्ट केली. या संस्कृतीतील लोकांना विभाजीत करण्यासाठी त्यांनी वर्णव्यवस्था स्थापित करून ब्राम्हण, वैश्य, आणि क्षत्रिय हे आर्यांचे वंश ठरविले ८५ टक्के मूळ भारतीय लोकांचा शुद्र हा वर्ण ठरविण्यात आला. ब्राम्हण, वैश्य आणि क्षत्रिय या १५ टक्के आर्यांनाच शिक्षण घेण्याचा अधिकार होता.

८५ टक्के मुळ भारतीयांच्या शिक्षण घेण्याचा अधिकार या वर्णव्यवस्थेने नाकारला. १५ टक्के आर्यानाच शिक्षण घेण्याचा अधिकार होता. ८५ टक्के भारतीय लोकांना शुद्र, दसू, दास ठरवून त्यांना शिक्षण घेण्यास, धनसंचय करण्याचा, शस्त्र बाळगण्याचा अधिकार ब्राम्हण संस्थेने नाकारला.

शुद्रातूनच पुढे अतिशुद्र नावाचा वर्ग तयार केला. या शुद्र व अतिशुद्राचे कार्य म्हणजे ब्राम्हण, वैश्य आणि क्षत्रिय या तिन वर्णातील लोकांची सेवा करणे. सेवा करतेवेळेस कोणत्याही फळाची अपेक्षा न करता काम करत राहणे म्हणजे वर्णाश्रम धर्म होय.

ब्राम्हणांची शुद्रांना विभागनि करून शुद्र आणि अतिशुद्र असे दोन वर्ण तयार केले.

१. शुद्र - माळी, कुणबी, सूतार, लोहार, कुंभार या बारा बलुतेदारांना शुद्र वर्ण दिला.
२. अतिशुद्र - महार, चांभार, भंगी या लोकांना अतिशुद्र वर्ण दिला.

ब्राम्हणी धर्मातील धर्मशास्त्राने अस्पृश्य लोकांचा एक नवा वर्ण तयार केला एकाच वंशाचे लोक अशा प्रकारे स्पृश्य-अस्पृश्य आणि अस्पृश्य - शुद्र असे विभाजीत केले.

**इतर मागासवर्गियांच्या बाबतीत सामाजिक विषमताः**
सामाजिक न्यायाची संकल्पना ही मुख्यत्वे समाजातिल सर्व माणसे समान आहेत. त्यांच्यात धर्म, वंश, जात, रंग आणि सप्रदाय यावरून भेदभाव केला जाऊ नये.

कलम १५ (१)
समाजात सामाजिक, राजकिय आणि आर्थिक परिस्थिती या दृष्टीने निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी जातीत, धार्मिक, वांशिक, प्रादेशीक, भाषिक पायावर उभ्या असणा-या सामाजिक आणि राजकिय संघटना मोडून काढव्या लागल्या. ज्या समाजात हजारो वर्षाची विषमता होती नुसती अशा समाजात समतेचा कायदा करून या धार्मिक, सामाजिक विषमतेला ओबीसी प्रवर्गामध्ये एकच उपाय आहे ते म्हणजे ओबीसीला आरक्षण देणे. हा एकमेव उपाय आहे. त्या उपायामुळे इतर मागासवर्गिय समाजात एक समाज समता दृष्टि समाजाची संकल्पना पूर्ण होईल. ओबीसी समाजाला इतर समाजाच्या पातळीवर एक येण्यासाठी ज्या मुलभूत गोष्टी उच्च समाजातील विद्यार्थ्यांना किंवा नागरिकांना मिळतात त्या सर्व मुलभूत गोष्टी मिळाल्यानंतरच ओबीसी समाज इतर समाजाच्या पातळीबरोबर येईल म्हणून डॉ. बाबासाहेब यांनी ओबीसीं मध्ये समानता प्रस्तापित व्हावी म्हणून आरक्षण एक औषध आहे. हजारो वर्षे ओबीसी जनजाती या पारंपारिक व्यवसाय मध्ये शेतमजूरी निगडीत बाराबलुतेदार म्हणून भारतात विखुरलेले आहेत किंवा दारिद्र्याच्या आर्थिक विषमतेत बुडालेले आहेत. या त्यांच्या मूळ सामाजिक सशक्त वर्गाची पुर्णरचना होणे आवश्यक आहे. त्यासाठीचा जालीम उपाय म्हणजे सर्वच क्षेत्रात आरक्षण मिळणे क्रमप्राप्त आहे. जी सामाजिक रचना भारतामध्ये जाती-जातीच्या रचनेमूळे त्यांना कोणते सामाजिक प्रतिष्ठा गेल्या अनेक वर्षापासून मिळालेले नाही त्यामुळे त्यांची समाजिक उत्थान किंवा प्रगती थांबलेली आहे. शिक्षण नसल्यामुळे उच्च पदावर नौकरीमध्ये त्यांचा सहभाग नाही. म्हणून ओबीसीवर नोक-यांमध्ये सुध्दा पाहिजे तेवढी टक्केवारी लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना मिळालेली नाही.

तसेच राजकारण्यामध्ये उच्च जातीकडून होणा-या नकारात्मक विचारांमूळे राजकारणामध्ये ओबीसी यांना भारत स्वातंत्र्य झाल्यापासून किंवा भारतात लोकशाही प्रस्तापित झाल्यापासून लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनीधित्व दिले जात नाही. ही इतर

मागासवर्गीयांच्या बाबतीत शोकांतिका किंवा खंत आहे. त्यामुळे सुध्दा इतर मागासवर्गियांच्या एकसमान समता दृष्टी समाजाची संकल्पना पूर्ण होण्यास अडथळा आहे.

इतर मागासवर्गियांच्या समाजिक आर्थ़िक विकास होण्याकरिता शिक्षण व राजकारणामध्ये ओबीसीची टक्केवारी किंवा पुरेसे प्रतिनिधीत्व मिळणे अति आवश्यक आहे.

**राज्य घटना आणि डॉ. बी.आर. आंबेडकर यांच्या योगदानामुळे ओबीसी मध्ये प्रस्तापित झालेली सामाजिक समताः**

भारतीय राज्यघटना सामाजिक न्यासाठी मागासवर्गियांच्या कामासाठी काम करते त्यामुळे राज्यघटनेत असलेल्या विविध कलमांचा फायदा इतर मागासवर्गियांच्या वास्तविक कायदे बनविण्यासाठी महत्वाचे ठरले. राज्यघटनेमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक आणि वैयक्तिक विकासासाठी अनेक दिशा निर्देश व सवलती दिलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करावी म्हणून अनेक गोष्टी राज्यघटनेत अंतर होत आहेत. इतर मागासवर्गियांच्या हजारो वर्षापासून असलेल्या सामाजिक व वैयक्तिक जिवनात जो अडथळा आहे. तो अडथळा राज्यघटनेत दिलेल्या कलमांच्या उपायामुळे दूर होणार आहे.

ओबीसीचा सामाजिक व आर्थिक विकास हजारो वर्षापासून थांबलेला आहे. त्यांच्यावर होणा-या अन्यायाची वाचा फोडण्यासाठी कोणी वाली नव्हता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसी यांना सर्व सामाजिक व इतर मुलभूत हक्काचा अभ्यास करून ओबीसींना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तसे आतापर्यंत झालेल्या ऐतिहासिक कालखंडात झालेला नाही. ओबीसीच्या परंपरागत मानसिकता ही त्यांच्या स्वतंत्र प्रगतीसाठी अडथळा बनली आहे. राज्यघटनेमुळे भारतात लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि लोकशाहीच्या प्रस्तापणेसाठी त्यांचा फायदा इतर मागासवर्गियांना होत आहे. जो की गेल्या हजारो वर्षापासून भारत स्वातंत्र्यानंतर ही सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने त्यांना उच्च वर्णीय किंवा धार्मिक अडथळ्यामुळे रोखले गेले होते.

लोकशाही असल्यामुळे व राज्य घटनेची अंमलबजावणी झाल्यामुळे भारतातल्या सर्व समाज घटकांना जीवन जगण्यासाठी असलेले मुलभूत हक्क मिळाले. त्यामुळे त्यांचा फायदा इतर मागासवर्गियांना सुध्दा झालेला आहे. परंपरागत व्यवसाय व आर्थिक दडपनशाही अडचणीत पडलेल्या इतर मागासवर्गिय समाजाला बाहेर काढण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेमध्ये ज्या कलमांचा समावेश केला. ते सर्व कलम किंवा कायदे ओबीसींचया सामाजिक स्तर वाढण्यासाठी उपयुक्त आहे व त्यामुळे ओबीसींमध्ये नवचैत्यन्य निर्माण झाले आहे. राज्यघटनेच्या कलम १९ मध्ये कोणी कोणतीही व्यक्ती कोणताही व्यवसाय भारतात कुठेही करू शकते.

**राज्यघटना कलम ३४०, ३४१, ३४२, ही अंमलबजावणी बाबत सरकारची भूमिकाः**

मुलभूत अधिकाराच्या प्रकारातील कलत १४, १५, १६, आणि २१ ही कलमे मानवी हक्काच्या बाबतीत व समानतेच्या बाबतीत अतिशय महत्वाचे आहे. भारतीय राज्यघटनेत कलम १५(१) हे वैधानिक समतेचे द्योतक असून कलम १५(३), १५(४) वास्तविक समतेची द्योतक आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १६(४) कलमात समाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या घटकांसाठी ज्या सवलती राखून ठेवल्या आहेत जातीचा समावेश सरकारने सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेल्या जातीत करावा व सवलती द्याव्या म्हणून हे कलम इतर मागासवर्गियांच्या साठी अतिशय महत्ववाचे आहे.

**समारोपः**

ओबीसीचा सामाजिक व आर्थिक विकास हजारो वर्षापासून थांबलेला आहे. त्यांच्यावर होणा-या अन्यायाची वाचा फोडण्यासाठी कोणी वाली नव्हता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओबीसी यांना सर्व सामाजिक व इतर मुलभूत हक्काचा अभ्यास करून ओबीसींना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तसे आतापर्यंत झालेल्या ऐतिहासिक कालखंडात झालेला नाही. ओबीसीच्या परंपरागत मानसिकता ही त्यांच्या स्वतंत्र प्रगतीसाठी अडथळा बनली आहे. राज्यघटनेमुळे भारतात लोकशाहीचे विकेंद्रीकरण आणि लोकशाहीच्या प्रस्तापणेसाठी त्यांचा फायदा इतर मागासवर्गियांना होत आहे. जो की गेल्या हजारो वर्षापासून भारत स्वातंत्र्यानंतर ही सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने त्यांना उच्च वर्णीय किंवा धार्मिक अडथळ्यामुळे रोखले गेले होते. असे अडथळे आता भारतीय राज्यघटनेतील तरतूदींमूळे दूर होतांना दिसत आहेत.

**संदर्भग्रंथः**


१. *डॉ. शशिकान्त लोखंडे, डॉ.बि.आर.आंबेडकर भारतीय संविधान, सविरो प्रकाशन गृह, पालघर.*
२. *नारायण बुधवंत, नेतृत्वहीन ओ.बी.सी. चळवळीची संघर्ष यात्रा.*
३. *रावसाहेब कसबे, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगत प्रकाशन, नागपूर.*
४. *स्वरूप चंद्र, पिछडा वर्ग और आंबेडकर.*
५. *कौशलेन्द्र प्रताप यादव, समाजवाद बनाम पिछडा वर्ग.*
६. *विजयकुमार वासनिक अनु., शाहूजी महाराज के ऐतिहासिक भाषण.*
७. *सतनाम सिंह, भारत की अनुसूचित जातीया, जनजातिया और पिछडा वर्ग.*
८. *कवि नरेश बाबू बौध्द, दलित और पिछडो का मसिहा ललई सिंह यादव.*
९. *हिरालाल शुक्ल, गुरू घासिदास संघर्ष, समन्वय और सिध्दान्त.*